# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ८७ वा ❑ मंगळवार दि.१३ मे २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## युद्धबंदी व युद्धविराम म्हणजे काय?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदी झालीआहे.दोन्ही देशांनी सध्या संघर्ष थांबवण्याचे मान्य केले आहे. दरम्यान, युद्धविराम हा शब्द अचानक चर्चेत आला आहे. अशा परिस्थितीत,युद्धबंदी म्हणजे नेमके काय ? खरं तर, युद्धविराम म्हणजे कोणत्याही संघर्षाचा अंत करणे. याचा अर्थ असा की जेव्हा ते अंमलात आणले जाते तेव्हा संघर्ष तात्पुरता किंवा कायमचा थांबतो.

युद्धविराम म्हणजे एका निश्चित वेळेत किंवा करारात लढाई थांबवणे. म्हणजे आता गोळीबार होणार नाही, हल्ला होणार नाही. दोन्ही पक्ष आपापल्या ठिकाणी शांततेत राहतील. जेव्हा दोन्ही बाजूंना असे वाटते की पुढील लढाई कोणाच्याही भल्यासाठी नाही तेव्हा अनेकदा युद्धबंदी होते. जीवित आणि मालमत्तेचे नुकसान होत आहे किंवा जनता दबाव निर्माण करत आहे. कधीकधी युद्धविराम फक्त काही तासांसाठी असतो, जसे की लोकांना वाचवण्यासाठी किंवा जखमींना मदत करण्यासाठी. आणि कधीकधी ते वर्षानुवर्षे टिकते, जसे २००३ मध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या युद्धविरामाचे. २००३ चा युद्धविराम २०२१ पर्यंत चालला, परंतु त्यानंतर अनेक वेळा त्याचे उल्लंघन झाले. तर यावेळी काही बदल होईल का? पण लक्षात ठेवा की युद्धबंदी म्हणजे शांतता नाही, तर फक्त लढाई थांबवणे होय.

जेव्हा जेव्हा एकमेकांशी लढणारे दोन देश सीमेवर कोणतीही आक्रमक कारवाई थांबवण्यास सहमत होतात आणि ती थांबवण्याचे आश्वासन देतात, तेव्हा ते दोन्ही देशांमधील युद्धबंदी मानले जाते. युद्धबंदीसाठी नेहमीच औपचारिक कराराची आवश्यकता नसते. दोन्ही देश त्यांच्या संमतीच्या आधारे हा निर्णय घेऊ शकतात. या कराराच्या पूर्ततेनंतरही, जर कोणत्याही देशाने सीमेवर आपली कारवाई सुरू ठेवली तर ते युद्धबंदीचे उल्लंघन मानले जाते.

**युद्धबंदी रेषेवर करार**

जर आपण भारत आणि पाकिस्तानबद्दल बोललो तर १९४७ मध्ये दोन्ही देशांमध्ये काश्मीरसाठी युद्ध झाले. हे युद्ध थांबवण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी हस्तक्षेप केला. संयुक्त राष्ट्रांच्या हस्तक्षेपानंतर, १९४९ मध्ये, भारत आणि पाकिस्तानने परस्पर संमतीने जम्मू आणि काश्मीरवर एक रेषा स्थापित केली, जी युद्धविराम रेषा मानली गेली. या मार्गावर एकमत होण्यासाठी भारत आणि पाकिस्तानच्या तत्कालीन लष्करप्रमुखांनी एक बैठकही घेतली होती.

**अनेक वेळा युद्धबंदीचे उल्लंघन झाले आहे.**

नियंत्रण रेषेवरील बॅरियर्स करारानुसार, दोन्ही देशांच्या सरकारांनी एकमेकांविरुद्धचा प्रचार थांबवण्याचा प्रयत्न करण्याचे मान्य केले होते. दोन्ही देश आंतरराष्ट्रीय सीमेवर तैनात असलेले सैन्य मागे घेतील. तथापि, तेव्हापासून आतापर्यंत भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदी कराराचा कोणताही परिणाम दिसून आलेला नाही. या युद्धबंदी कराराचे पाकिस्तानकडून अनेक वेळा उल्लंघन करण्यात आले आहे.

अडथळे उभारल्याबद्दल पाकिस्तान भारतावर संतापला होता. भारताने १९९० मध्ये नियंत्रण रेषेवर अडथळे उभारण्यास सुरुवात केली. पण १९९९ मध्ये दोन्ही देश पुन्हा युद्धासाठी आमनेसामने आले. २००४ पर्यंत अडथळे पूर्ण झाले. अडथळे बसवण्यावर पाकिस्तान संतापला होता. भारत संबंध बिघडवण्यासाठी हे करत आहे असे त्यांचे मत होते. अमेरिका आणि युरोपच्या दबावाखाली, भारत आणि पाकिस्तानने युद्धबंदी जाहीर करण्याचा निर्णय घेतला.

अटलबिहारी वाजपेयी यांनी अनेक प्रयत्न केले होते

नियंत्रण रेषेवर अडथळे बसवण्यावर पाकिस्तान खूश नव्हता. भारत सीमेवर कुंपण घालत आहे हे पाकिस्तानला आवडले नाही. नोव्हेंबर २००३ मध्ये, भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने एक मोठी घोषणा केली. त्यांनी भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदीची घोषणा केली. हा निर्णय तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रयत्नांचे फळ होता. २५ नोव्हेंबर २००३ रोजी युद्धबंदी लागू झाली. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, एका आठवड्याच्या चर्चेनंतर हा करार झाला. या बैठकीत भारत आणि पाकिस्तानचे उच्च लष्करी अधिकारी सहभागी झाले होते. परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, हे युद्धबंदी ४५० मैल लांबीच्या एलओसी आंतरराष्ट्रीय सीमा आणि सियाचीन ग्लेशियरवर देखील लागू होते.

# औषधवेडे नव्हे, तर निसर्गवेडे व्हा-डॉ.रामदास सपकाळ

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** औषधवेडे नव्हे, तर निसर्गवेडे व्हा, असे प्रतिपादन प्रसिद्ध निसर्ग उपचारतज्ज्ञ डॉ. रामदास सपकाळ यांनी रविवारी, ११ रोजी विवेकानंद विचारमंच व्याख्यानमालेत बोलताना केले. केशवनगरमध्ये आयोजित तृतीय व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बबनराव जगाडे होते.

प्रारंभी डॉ. सपकाळ यांचे बाळकृष्ण बाभूळगावकर यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. शालीवाहन संशोधन मंडळ आणि भारतीय ज्ञान संस्थेचे विकास संचालक डॉ. वि. ल. धारूरकर यांनी सपकाळ यांचा परिचय करून देत विषयाचे महत्व विशद केले.

डॉ. सपकाळ म्हणाले, आपले शरीर पंचमहाभूतांनी बनलेले आहे. त्यावर आपण विविध रसायनांचा आणि औषधांचा मारा करतो, त्यामुळे प्रकृती अधिकाधिक सुधारण्याऐवजी बिघडत जाते. १८२६ मध्ये जर्मनीतील प्रिन्स नील्स यांनी निसर्ग उपचाराची स्थापना केली. पुढे या शास्त्राचा जगभर विकास झाला. पुढे युरोप आणि अमेरिका तसेच आशिया खंडातही निसर्गोपचाराचा प्रसार झाला. प्राचीन भारतामध्ये तर आयुर्वेद हे निसर्गोउपचारावर आधारलेले शास्त्र होते. सर्व पॅथी या मानवाच्या आरोग्याला पूरकच आहेत. कुठल्याही पॅथींचा उपयोग करा, परंतु निसर्गाशी असलेले नाते माणसाने कायम ठेवले पाहिजे, त्यामुळे दुर्धर रोगाचा परिणाम कमी करता येतो, असे डॉ. सपकाळ म्हणाले.

लुई कुळे या जर्मनीतील आणखी एका शास्त्रज्ञाने निसर्गोपचारात शास्त्रीयता आणली, असे सांगून डॉ. सपकाळ म्हणाले, भारतामध्ये ऋषिमूनी व दार्शनिक हे निसर्गोपचाराचा उपयोग करत. त्यांचे गुरूकुल प्रामुख्याने निसर्गाच्या परिसरातच असत. त्यामुळे निसर्गासोबत राहून आपल्या आरोग्यमान व आयुर्मान वाढविण्याचा प्रयत्न ऋषिमुनींनी केला. स्व. महात्मा गांधी यांनी भारतामध्ये निसर्गोपाचारांच्या प्रयोगानां गती दिली. त्यांच्याच प्ररणेने पुण्यातील उरळी कांचन येथे भारतातील पहिले निसर्गोपचार केंद्र स्थापन झाले व ते आजही कार्यरत आहे. माजी प्रतप्रधान मोरारजी देसाई तसेच अटलबिहारी वाजपेई यांनीसुद्धा निसर्गोपचार व आयुर्वेदाचे महत्व ओळखून त्यास गती दिली. वाजपेई यांनी तर आयुर्वेदाचे स्वतंत्र मंत्रालय स्थापन करून संबंध जगामध्ये भारतीय उपचार पद्धती लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केला. निरोगी जिवन हा आपला मूलभूत हक्क आहे, असे संयुक्त राष्ट्रसंघ आणि जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे. यास अनुसरून निसर्गअनुकूल जिवन कसे जगता येईल, याचा विचार केला पाहिजे. वर्तमान काळातील आपली जिवनशैली कृत्रिम असून, यामुळे मधुमेह, रक्तदाब, कर्करोग, एडस् यासारख्या रोगांना माणूस बळी पडत आहे. या सर्व दुर्धर रोगांपासून मुक्त व्हायचे असेल तर निसर्गाच्या सान्निध्यात राहून आपले निसर्गाशी असलेले नाते अधिक भक्कम करण्याची गरज आहे, असेही ते म्हणाले.



आरोग्य म्हणजे केवळ एखाद्या रोगावर उपचार नव्हे तर आरोग्य म्हणजे सामाजिक, आर्थिक, मानसिक, अध्यात्मिक आणि संपूर्णपणे शारीरिक सुदृढता निर्माण करणे होय. सर्वांसाठी आरोग्य साध्य करताना आपण निसर्गोपचार प्रणालीचा उपयोग केल्यास कमी खर्चात अधिक प्रमाणात लोकांना जीवनदायी मंत्र देवू शकतो, असेही ते म्हणाले.

मानवी शरीर कोट्यवधी पेशींनी बनलेले आहे. यात पेशींचे सकारात्मक कार्य आपण लक्षात घेतले पाहिजे आणि त्या पेशींची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी निसर्गाची साधना करून आपण अधिक बळकटी देवू शकतो. सर्व पेशीगट इंद्रिय संस्था बळकट करतात. आपली पचन संस्था ही सुधारावयाची असेल तर निसर्गाशी आपले नाते चांगले ठेवले पाहिजे. व्यायाम, आहार, विहार, प्राणायाम यामुळे निसर्गाशी आपले नाते चांगले राहून आरोग्यसुद्धा चांगले राहते, असेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी झालेल्या चर्चेमध्ये श्रीमती शेवाळकर, अनिल देशमुख, डंभाळे गुरूजी, मनोज शिंदे, जयंत भोयरेकर, मनोज शिंदे, घोडके पाटील यांनी चर्चेत भाग घेतला. डॉ. रामदास सपकाळ यांनी स्वयंसेवकांनी विचारलेल्या आरोग्यविषयक प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. विजय जोग यांनी आभार मानले. रमेश बुरांडे, उल्हास देशमुख, कंडारकर, धोंडगे, आनंद परळीकर, विजय अंबेकर, गोरख शिरसे आदी उपस्थित होते.

# युगंधरा प्रतिष्ठान तर्फे भव्य राज्यस्तरीय धर्मवीर छत्रपती संभाजीराजे काव्यलेखन स्पर्धा

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** युगंधरा मराठी साहित्य, कला व सांस्कृतिक प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने महाराष्ट्रातील प्रतिभावान व नवोदित साहित्यिकांना एक हक्काचे व्यासपीठ मिळावे, त्यांच्या साहित्याला नवी ओळख मिळावी या उद्देशाने या साहित्य संमेलनाचे आयोजन होत आहे.

धर्मवीर छत्रपती संभाजी राजे जयंती प्रित्यर्थ आयोजित धर्मवीर संभाजी राजे काव्यकरंडक स्पर्धा २०२५ या स्पर्धेचा विषय आहे धर्मवीर संभाजी राजे, सहभाग कालावधी ६ मे २०२५ ते १४ मे २०२५ असून सहभाग शुल्क – १०० रुपये आहे.. (फोन पे/गुगल पे नंबर ८३९०८१९४४६) स्पर्धेचे बक्षीस (२) सर्वोत्कृष्ट धर्मवीर संभाजी राजे काव्यकरंडक विजेता, काव्यकरंडक,रोख रक्कम व डिजिटल सन्मानपत्र

प्रथम क्रमांक – सन्मानचिन्ह व डिजिटल सन्मानपत्र, द्वितीय क्रमांक – सन्मानचिन्ह व डिजिटल सन्मानपत्र, तृतीय क्रमांक – सन्मानचिन्ह व डिजिटल सन्मानपत्र. स्पर्धा नियम पुढील प्रमाणे आहेत.१) काव्यप्रकाराचे बंधन नाही. २) कविता स्वलिखित व मराठी भाषेत असावी. ३) कविता कमीत कमी पाच कडव्यांची व जास्तीत जास्त आठ कडव्यांची असावी. ४) कविता युगंधरा स्पर्धा समूहातच टाकण्यात यावी व कवितेसोबतच १००/–रू.भरल्याचा स्क्रीनशॉट समूहातच टाकावा. ५)कविता पाठवण्यासाठी अंतिम दिनांक हा १४ मे असेल त्यानंतर आलेल्या कवितांचा विचार केला जाणार नाही. ६) परीक्षकांचा व आयोजकांचा निर्णय अंतिम असेल तसेच ऐनवेळी नियमांमध्ये बदल करण्याचा अधिकार आयोजन समितीकडे राहील. ७) आपल्या कवितेवर कोणी आक्षेप घेतल्यास त्याचे निराकरण स्पर्धकाने स्वत:च्या जबाबदारीवर करणे आवश्यक राहील.

८) सहभागी स्पर्धकांना व विजेत्यांना व डिजिटल सन्मानपत्र देण्यात येतील. व विजेत्यांना सन्मानचिन्ह देण्यात येतील, ९)स्पर्धेसाठी काव्यरचना युगंधरा स्पर्धा समूहात टाकाव्यात.

महत्वाचे – विजेत्यांना सन्मानचिन्ह कुरीयरने पाठवले जाईल. संपर्क–सौ. सुनिता कावसनकर,

संस्थापक अध्यक्षा, युगंधरा मराठी साहित्य कला व सांस्कृतिक प्रतिष्ठान ८३९०८१९४४६ (Whatsapp) ८०१०३४४८८० (Calling) अविनाश गडवे, समूह प्रमख ९८८१०९५०१६ आयोजक युगंधरा मराठी साहित्य, कला व सांस्कृतिक प्रतिष्ठान,छत्रपती संभाजीनगरच्या वतीने सौ. सुनिता कावसनकर, संस्थापक अध्यक्षा, समूह प्रमुख, अथर्व कावसनकर,समूह प्रमुख तसेच सर्व युगंधरा समिती प्रमुख कार्यकारी सदस्य सौ. संगिता राजपूत, सौ.माधुरी भट–कुलकर्णी,सौ.भावना नेमाडे,श्री.राम सोनूने व सविता तुपे यांनी या स्पर्धेचे आयोजन केले आहे. सर्व साहित्यिकांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सामिल व्हावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यातआले आहे.

आजवरच्या साहित्य सेवेत सक्रिय राहून या समूहाने अनेक भव्यदिव्य राज्यस्तरीय काव्यस्पर्धा, साप्ताहिक विशेषांक, अत्यंत अल्पदरात प्रातिनिधिक काव्यसंग्रह तसेच १५ डिसेंबर २०२४ रोजी भव्यदिव्य साहीत्य,कला व सांस्कृतिक संमेलन व काव्यसंमेलन आयोजित केले होते.





# सिद्धिविनायक सारसबाग मंडपात श्री योगेश्वर भगवंत प्रगटोत्सव साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे (उज्वला धर्माधिकारी)–** अंबरिष राजाच्या भक्तिला प्रसन्न होऊन प्रत्यक्ष भगवंत श्रीक्षेत्र बार्शी येथे प्रगट झाले तो पावन दिवस म्हणजे वैशाख शुध्द द्वादशी. असे बार्शीचे स्थान महात्म्य आहे.

श्री भगवंताचे स्थान महात्म्य हे युगानुयुगे बार्शी क्षेत्राला रहाणारं आहेचं, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. पण कामधंद्यासाठी पोटापाण्यासाठी जे बार्शीकर पुण्यात स्थाईक झाले आहेत त्या गावकऱ्यांना आपण पुण्यासारख्या शहरात भगवंत प्रगटोत्सव साजरा करावा आपल्या जन्मभुमीच्या ऋणात राहून साक्षात योगेश्वर भगवंताची पूजा कर्म भूमित करावी अशी संकल्पना मांडली गेली. चांगल्या कामाला नेहमीच सर्वांचे सहकार्य लाभते तसेचं कालच्या कार्यक्रमाचे झाले. अतिशय सुनियोजित, शिस्तबध्द शांततेत मंगलमय वातावरणात श्री भगवंत महोत्सव पुण्य नगरीतील श्रीमंत पेशवे सरकारने स्थापन केलेल्या सिद्धिविनायक सारसबाग मंडपात भगवंत प्रगटोत्सव वैशाख शुद्ध द्वादशी रोजी हा कार्यक्रम झाला. ह,भ,प श्री करंदीकर बुवांचे किर्तन, सनई, चौघडे यांच्या मंगल ध्वनीत श्रीं च्या चरणकमलावर गुलाल पुष्प उधळून भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

सारसबागेसारख्या आराध्य दैवताचा आशीर्वाद व त्याला भेटायला आलेला बार्शीकर *श्री भगवंत * हा अनुपम्य सुख सोहळा याची देही याची डोळा पहाण्याचे भाग्य लाभले. श्रीविष्णू याग, विष्णू सहस्त्रनाम, भजनी मंडळाचे भजनाने व भक्ति गीताच्या कार्यक्रमाने या सुख सोहळ्याची सांगता झाली. संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्याची जबाबदारी श्रीमान सदस्य श्री ओंकार एकशिंगे, कैलास बडवे शिरशीकर सर श्री उन्हाळे सर जगदाळे सर, चिन्मय कुलकर्णी देवाभाऊ मोरे सर, सुनंदा पराडकर, सुनिता पाटील, ऊज्वला धर्माधिकारी या सर्वांचे योगदानाने तर आदरणीय सुनंदाताई पराडकर, उत्साहाने सर्वांची आपुलकीने चौकशी करून आनंद देत होत्या. तरूणाईला लाजवेल असा त्यांचा उत्साह होता. भगवंत भेटीचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर ओसंडून वहात होता.







– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...

## व्यक्त होणे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचे लक्षण


ज्योतिर्मय साहित्य

आपल्या संवादातून, लेखनातून, देहबोलीद्वारे आणि विविध क्रिया-प्रतिक्रियांतून आपण व्यक्त होत असतो. व्यक्त न होणाऱ्या व्यक्तीची घुसमट वाढत जाते. मोकळेपणानं मनांतील विषय एखाद्याला सांगितले कि मनावरचा ताण, दडपण कमी झाल्याचं देखील जाणवतं. ह्या मोकळ्या होण्यातून आपल्या समस्यांचं निराकरण होत जातं. काहीवेळा उद्भवलेल्या प्रश्नांची उकल होत जाते.

मनातील भय, न्यूनगंड दूर होण्याच्या दृष्टीनं मोकळेपणानं आपल्या मनांतील शंका व्यक्त करणं उपयुक्त ठरतं. आपल्याला पडलेले प्रश्न केवळ आपल्याच भ्रम आणि संभ्रमामुळे निर्माण होत असतात. प्रत्येक वेळेला प्रत्येक प्रश्नाची उत्तरं सारखी नसतात, प्रत्येकाचे प्रश्न निराळे असतात, उत्तरेही प्रत्येकासाठी भिन्न असतात. जसं व्यक्ती तितक्या प्रकृती तसंच, जसे प्रश्न तशी त्यांच्यासाठी उत्तरे, हे लक्षात घेणं जरुरीचं असतं. एखाद्या समस्येचं उत्तर सर्वांनाच लागू होतं असं नाही, हेही समजून घेणं आवश्यक असतं.

व्यक्त होणारीच व्यक्ती असते; अशाच व्यक्तीचं व्यक्तिमत्व चार चौघांपेक्षा निराळं असतं. खरं तर, व्यक्त न होणारा जीव ह्या भूतलावर सापडणे विरळाच. जन्माला आलेला प्रत्येक जीव काही ना काही प्रकारे व्यक्त होण्याचा प्रयत्न करतच असतो. ते व्यक्त होणं आवाजाच्या माध्यमातून, लिखित स्वरूपांत, देहबोलीच्या वापरांतून होत असतं. आपल्या अंतर्मनांत येणारे विचार, विषय, घटना, अनुभव आपण अगदी जवळच्या, आपल्या हक्काच्या व्यक्तीजवळ बोलून दाखवत असतो. म्हणजेच एकप्रकारे आपण व्यक्तच होत असतो. तसं करण्यामुळे आपल्या मनांत साठून राहिलेल्या विचार बाहेर पडतात, त्यांना मोकळी वाट करून दिली जाते. निसर्ग नियमानुसार ते गरजेचं असतं.

## मानवी मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य


श्रीराम विष्णूंचा अंश आहे, परमेश्वरी अवतार आहे म्हणून जर त्यांना आपल्या आयुष्यात घडणाऱ्या पुढील घटनांचे ज्ञान आहे असे क्षणभर गृहीत धरले तर... ? कदाचित रामायणात जे घडले आहे ते घडलेच नसते ! आजच्या भाषेत सांगायचे तर एवढे रामायण कशाला घडले असते ? आणि श्रीरामांना भविष्यकालीन घटनांचे ज्ञान आहे असे क्षणभर गृहीत धरले तर न्यायाने लक्ष्मण आणि सीतेलाही ते असायला हवे कारण ते सुद्धा दैवी अवतार अवतार आहेत, दैवी शक्तीचा अंश आहेत आणि मानवी रूपाने या धरेवर अवतीर्ण झाले आहेत. पण अशी शक्यता गृहीत धरली तर...? पुढील प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. किंवा पुढील घटना घडल्याच नसत्या.



रावणाचा मामा मारीच हा सुवर्णमृगाचं रूप घेऊन आला आहे, त्याच्यामागे जाण्याची आपल्याला आवश्यकता नाही. गेलो तर आपल्या माघारी रावण साधुवेशाने येऊन आपल्या प्रिय पत्नीला पळवून नेईल या सर्व गोष्टी ज्ञात असत्या तर असा कोणता पती आहे की जो आपल्या पत्नीला संकटात टाकून निघून जाईल ? ज्याचे सीतेवर अपरंपार प्रेम होते आणि सीतेशिवाय दुसऱ्या कोणत्या स्त्रीची कल्पनाही ज्याने कधी मनात आणली नाही असा श्रीरामांसारखा आदर्श पती स्वप्नातही असे करणे शक्य नाही. पण श्रीराम आता मानवी अवतारात होते. मानवी देहाच्या सर्व मर्यादा आणि वैशिष्ट्ये त्यांना पूर्णपणे लागू होतात. म्हणूनच भविष्यात होणाऱ्या घटनांची पूर्वसूचना किंवा ज्ञान त्यांना नाही, असण्याची शक्यता वाटत नाही. नाहीतर मग मानवी रूपात अवतार घेण्याचा उपयोग झाला नसता.

लक्ष्मणालाही भविष्यातील घटनांचे ज्ञान असते तर सीतेला कुटीत एकटे सोडून तो कदापिही गेला नसता. त्याला मग लक्ष्मणरेषा आखण्याची गरजच पडली नसती. तो स्वतःच तिचे संरक्षण करण्यास समर्थ होता. सीतेलाही पुढील घटनांचे ज्ञान असते तर.. ? रावण आपल्याला बळजबरीने पळवून नेईल हे तिला कळले असते तर ? तिने आश्रमाबाहेर पाऊलही ठेवले नसते. किंबहुना राम आणि लक्ष्मणाला बाहेर जाऊ दिलेच नसते. रावणाची सगळीच योजना अयशस्वी ठरली असती. पण या गोष्टी घडायच्याच होत्या. राम, लक्ष्मण, सीता ही सगळी मंडळी मानवी देहात होती. त्यांना या सगळ्या प्रसंगांना सामान्य माणसांसारखे तोंड देणे ही नियती होती. पण अशा प्रसंगात ते ज्याप्रकारे वागले, त्यातून त्यांनी आदर्श घालून दिला.

(क्रमशः)



दासबोध स्तवन




उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## मृत्यूनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

समासाच्या सुरवातीला आपण अभ्यासले की मरण हे केव्हाही कुठेही येऊ शकते त्याच्याच पुढच्या ओवीचा आपण अभ्यास करूया.

अध्यात्मिक, आधिभौतिक, आधिदैविक या तीनही तापात जीवनमरण यांचा आढावा घेतला आहे. यम यातना पुष्कळ आहेत. घमेंड करू नये. मरणाचे चिंतन करून माणूस म्हणून वागावे. तत्वज्ञान म्हणजे मरण व अंतकाळ यांचा सुक्ष्म अभ्यास होय. मरणाच्या/ज्ञानाबद्दल कुतूहल असते. कंठोपनिषदातील नचिकेताचे आख्यान, छांदोग्य ऊपनिषदातील वर्णन वाचताना तर मंडळी अक्षरशः अंगावर शहारे येतात. त्यात लिहिले आहे. फरफटत मारतात, झोके देऊन पाडतात. एका मागून एक यमयातना सारख्या चालूच असतात. यमाच्या यातना आक्राळवीक्राळ आहेत. या सर्व यातना पापी, नीच, जीवनभर अयोग्य वर्तन केलेल्या लोकांच्यासाठी आहेत. म्हणून सर्वानी आदर्श वत जीवन जगावे. गीतेच्या आठव्या अध्यायात तर भगवंताने मरणाचा खुप खोल विचार मांडला आहे. तद्वतच दासबोधात पण समर्थानी. एक समासच यावर घेतला आहे. संतांचे सांगणे आहे की द्वैताने किंवा भेदान भरलेल्या द्रुष्य विश्वामध्ये जन्म व मरण एकमेकांना सोडून राहू शकत नाही. अंतकाळ कशाला म्हणतात आत्मस्वरूपाच्या विस्मृतीत रहाणारे जीव असतात त्या जीवांना आनंदाची तहान लागते. तो आनंद द्रुष्य देह निर्माण करतो. ज्या द्रव्यापासून तो देह तयार होतो. त्याची काळानंतर झीज होते तो देह कालांतराने कुचकामी होतो. तो जगण्यासाठी लायक ठरत नाही. तेव्हा जितक्या सहजपणे जीव देह धारण करतो तितक्याच सहजपणे तो जीव देहातून बाहेर पडतो. यालाच मरण असे म्हणतात. **(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नामाचे प्रेम येण्यासाठी खरी कळकळ पाहिजे

ज्योतिर्मय साहित्य

नामाचे प्रेम का येत नाही, हा प्रश्न बहुतेकजण विचारतात. पण थोडासा विचार केला तर असे लक्षात येईल की, हा प्रश्नच बरोबर नाही. मूल न झालेल्या बाईने, मुलाचे प्रेम कसे येईल ? असे विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. मूल झाले की प्रेम त्याच्याबरोबरच येत असते. तेव्हा मुलाचे प्रेम कसे येईल हा प्रश्न करण्याऐवजी मूल कसे होईल याचाच विचार करणे बरोबर ठरेल. आपणसुद्धा प्रश्न करायचाच असेल तर नामाचे प्रेम कसे येईल असा करण्याऐवजी, मुखी नाम कसे येईल असा प्रश्न करणे बरोबर होईल. मुखी नाम यायला वास्तविक आडकाठी कोणाची आहे ? दुसर्या कोणाचीही नसून आपली स्वतःचीच आहे. वास्तविक, एकदा नाम घ्यायचे ठरवून सुरूवात केली की झाले. पण तसे होत नसेल तर, दोष दुसर्या कोणाचा नसून आपला स्वतःचाच आहे. म्हणून नाम घेणे हे आपले काम आहे; मग त्याच्या पाठोपाठ येणे हा प्रेमाचा धर्मच आहे. जसे आईच्या बाबतीत, मूल आणि प्रेमाचा पान्हा ही निराळी असूच शकत नाहीत, तसे नाम आणि त्याचे प्रेम ही एकमेकांना सोडून राहूच शकत नाहीत. ह्यावरून एक गोष्ट अशी ठरली की, प्रेम का येत नाही, याचे उत्तर आमच्याजवळच आहे, आणि ते म्हणजे, नाम घेत नाही म्हणून. यावर कोणी असे म्हणेल की, आम्ही नाम घेतोच आहोत, तरीही प्रेम का येत नाही ? हे विचारणे ठीक. पण आता आम्ही जे नाम घेतो म्हणून म्हणतो, त्याचा विचार केला तर काय दिसेल ? पोटी जन्माला आलेल्या मुलाबद्दल जसा कळवळा असतो, तसा नामाबद्दल आपल्या ठिकाणी कळवळा नसतो. सर्व संतांनी किंवा आपल्या गुरूने, नाम घ्यावे असे सांगितल्यामुळे आपण ते घेतो, किंवा दुसरे काही करायला नाही म्हणून घेतो, इतकेच. अर्थात, तसे घेतले तरी आज ना उद्या आपले काम होईलच. पण प्रेम का येत नाही, असा प्रश्न विचारण्यापूर्वी, आपण नाम किती आस्थेने घेतो, हा प्रश्न स्वतःला विचारणे जरूर आहे. एखाद्या बाईला फार दिवसांनी मूल झाले तर त्याच्याबाबतीत तिची जी स्थिती होते ती नामाच्या बाबतीत आपली होणे जरूर आहे.

आपल्या देहाची वाढ जशी आपल्याला नकळत होते, तशी आपली पारमार्थिक उन्नतीही आपल्याला नकळत झाली पाहिजे. ती कळली तर सर्व फुकट जाण्याचा संभव असतो. परमार्थात मिळविण्यापेक्षा मिळविलेले टिकविणे, हेच जास्त कठीण आहे. ज्याला मी काही तरी झालो असे वाटते तो काहीच झालेला नसतो. अशा माणसाने फारच सांभाळले पाहिजे.

नवर्याला देव आवडत नाही म्हणून बायकोने नामस्मरण सोडण्याचे कारण नाही. तिने नाम घेतले तर धर्म सोडला असे न होता उलट संसार सुखाचा होईल.

॥ संत - महात्म्य ॥


संकलन : मधुकर बोरीकर
9403061886 (स्त्रोत:- इंटरनेट)

## संत जनाबाई

ज्योतिर्मय साहित्य

गुणातीत डहाळी पाळणा लाविला /
तेथे सूत पहुडला मुक्ताईचा /
निजी निज बाळा न करी पैं आळी /
अनुहात टाळी वाजविते //२//
निद्रा ना जागृती भोगी पैं उन्मनी /
लक्ष ते भेदुनी निज पाटी //३//
निभ्रांत आता पाळणा विणवुणी /
मन हे बोधोनी पवन दोरा //४//
एकवीस सहस्त्र श्वास वेळोवेळा /
बाळा तोही डोळा स्थिर करी //५//
निद्रां ना जागृती निजलीस काई /
परियेसी चांगया बोले मुक्ताई //६//

या अभंगाला सुरुवात करण्यापूर्वी प्रथम आपण चांगदेव महाराज कोण होते ?त्यांचा योगाभ्यास कसा होता? त्यांचे गुरु कोण होते? याविषयी आधी आपण माहिती करून घेऊ. म्हणजे त्यांना अभंगातून काय म्हणायचे आहे, याचा उलगडा आपणास होईल.



चांगदेव हे देखणे सुंदर असे होते, म्हणून त्यांचे नाव ''चांगले'' यावरून चांग देव असे पडले. पूर्णा नदी व गोदावरी नदी यांच्या तीरावर त्यांनी प्रचंड तपसाधना केली. त्यांच्या आयुष्याविषयी दोन मते आहेत. एका मतानुसार ते ज्ञानेश्वर माऊलीच्या काळी, त्यांच्या भेटीच्या वेळी, चौदाशे वर्षाचे होते. तर काहींच्या मध्ये ते चौ दश म्हणजे ४० वर्षाचे होते. हा स्पष्टतेचा अभाव आपण बाजूला ठेवूयात. पण त्यांनी प्रचंड योग साधना केली होती.

ज्यावेळेस त्यांना ज्ञानेश्वर माऊली यांची कीर्ती कानावर आली, त्यावेळेस त्यांना त्यांच्या भेटीची उत्सुकता लागली. भेटीस येण्याची परवानगी मागण्यासाठी त्यांनी एक पत्र लिहायला घेतले. त्या पत्रावरील मायना काय असावा यावरून त्यांचे मनात संभ्रम निर्माण झाला. कारण ज्ञानेश्वर माऊली यांना चिरंजीव ज्ञानेश्वर असे एकेरी संबोधने त्यांच्या भगवत स्वरूप प्रचंड दैदिप्यमान तेजस्वी सूर्या सारख्या साधने पुढे योग्य नव्हते, आणि आदरार्थी वचन वापरावे तर हा बालक केवळ पंधरा-सोळा वर्षाचा. या संभ्रमात त्यांनी पत्राचा कोरा कागद लखोट्यात बंद करून, शिष्या हाती पाठविला. ज्यावेळेस हे पत्र ज्ञानेश्वर ,निवृत्तीनाथ सोपान व मुक्ताबाई या बालकांच्या हाती पडले त्यावेळेस आठ दहा वर्षाची असणारी मुक्ताई अचानक बोलून गेली *''हा मेल्या चांगा कोराच्या कोराच राहिला*. आपणास साहजिकच असा प्रश्न पडेल की, इतकी वर्ष प्रचंड साधना करणारा चांगदेव कोरा कसा? व आठ दहा वर्षाची बालिका मुक्ताई ही पुढे त्याची गुरु कशी झाली?

(क्रमशः)



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**ऐश्वर्यस्य विभूषणं सुजनता शौर्यस्य वाक्संयमो**
**ज्ञानस्योपशमः श्रुतस्य विनयो वित्तस्य पात्रे व्ययः ।**
**अक्रोधस्तपसः क्षमा प्रभवितुर्धर्मस्य निर्व्याजता**
**सर्वेषामपि सर्वकारणमिदं शीलं परं भूषणम् ।।**

अर्थ – ऐश्वर्याचे आभूषण सौजन्य, शौर्याचे आभूषण वाक्संयम, ज्ञानाचे आभूषण शांती, ज्ञानवानाचे आभूषण विनय, धनाचे आभूषण सत्पात्री व्यय, तपस्येचे आभूषण अक्रोध, सत्तेचे आभूषण क्षमा, तसेच निष्कपटता हे धर्माचे आभूषण आहे. पण समस्त गुणांचे कारण शील आहे. तेच सर्वश्रेष्ठ आभूषण होय.

या श्लोकात कविराज भर्तृहरींनी शील म्हणजे चारित्र्याचे महत्व प्रतिपादन केले आहे. ऐश्वर्यादि सर्व गुणांमध्ये शील महत्वाचे आहे. ते सर्व गुणांचे कारण आहे. तेच खरे सर्वश्रेष्ठ आभूषण आहे, असा आशय येथे अभिव्यक्त करण्यात आला आहे.




## स्वस्त पण बहुगुणी तुरटी

ज्योतिर्मय साहित्य

सांधेदुखी व त्यावरील घरगुती उपाय

चालताना, उठताना व बसताना, काम करताना, वाकताना सांध्यांमध्ये त्रास होतो. अश्या वेळी सांधेदुखीवर घरगुती उपाय करून आराम मिळू शकतो.

१) सांधेदुखीचा त्रास असल्यास दोन चमचे बडीशोप व सुंठीचा तुकडा चार कप पाण्यामध्ये घालून एक कप राहील तो पर्यंत उकळावे व अर्धा चमचा एरंडेल तेल घालून घ्यावे. याप्रमाणे महिना भर केल्यास सांधेदुखीचा त्रास कमी होईल.

२) दोन चमचे सुंठ व दोन चमचे एरंदमुळाची भरड चार कप पाण्यात उकळावे व एक कप पाणी राहिल्यावर गळून घ्यावे. व पिऊन घ्यावे. हा काढा नियमित घेतल्यास सांधेदुखी मध्ये निश्चित आराम मिळेल.

३) निर्गुडीची पाने पाण्यामध्ये उकळून त्याच्या वाफेने सांधा शेकल्यास सुज व वेदना कमी होतात.

४) मूठभर ओवा एरंडतेल तव्यावर गरम करून सुती कापडात बांधून पोटली करावी व त्याने दुखणारा सांधा शेकावा.

५) एरंडची पाने वाफवून कुटून दुखत असलेल्या सांध्यावर बांधावे.

६) रोजची कनिक मळताना चमचाभर एरंड तेलाचे मोहन घालून केलेली पोळी किंवा फुलका खावा. याने सांधेदुखीचा व सर्व सांधे संबंधित समस्या दूर होतात.

७) सांधे दुखत असल्यास मेथीचे व डिंकाचे लाडू नियमित खाल्ल्यास फायदा होतो.

रात्री उशिरा भरपेट जेवण करू नये, वजन जास्त असल्यास कमी करावे, नियमित योगासने करावी, व सकाळी चालायला जावे. असे केल्यास सांधे दुखीचा त्रास होत नाही.

तीळ व आयुर्वेदिक पद्धतीने बनवलेले तेल नियमित लावल्यास व आहारामध्ये योग्य प्रमाणात साजूक तूप समाविष्ट केल्यास शरीराचे स्नेहन होऊन सांधेदुखी कमी होते.

केसातील कोंडा घालवण्यासाठी सोपे उपाय:-

केसांची योग्य प्रकारे निगा न ठेवल्यामुळे केसांमध्ये कोंडा होतो. सगळ्यात जास्त केसात कोंडा थंडीच्या दिवसांमध्ये होतो कारण थंडीमुळे केसांमध्ये कोरडेपणा येतो त्यामुळे केसांमध्ये कोंडा होतो. केसांना पर्याप्त मात्रेत पोषण न मिळाल्यामुळे देखील कोंडा होतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

त्याचबरोबर जास्त तेलकट पदार्थ, तिखट व कमी पाणी प्यायल्यामुळे देखील कोंडा होतो. तसेच आपण केसांना झटपट सुंदर करण्यासाठी केमिकल युक्त कॉस्मेटीक प्रोडक्टस चा वापर करतो, यांच्या परिणामांमुळेमुळे देखील कोंडा होऊ शकतो.

जर आपल्याला या समस्यां मुळापासून नष्ट करायच्या असतील तर आपण काही घरगुती उपाय करून पहा

१.लिंबू आपल्या केसांसाठी खूप फायदेमंद आहे. ३ ते ४ लिंबू घ्या व त्यांची साले काढून त्यांना जवळ जवळ अर्धा लिटर पाण्यात १५ ते २० मिनटासाठी उकळवा व नंतर पाणी थंड झाल्यावर हे पाणी आठवड्यातून दोन वेळा आपल्या केसांमध्ये लावा. असे केल्याने आपल्या केसांमधील कोंडा दूर होईल आणि आपले केस चमकदार होतील.

२. कडुलिंब ची पाने बारीक वाटून घेवून त्याची पेस्ट बनवा आणि आपल्या केसांमध्ये लावा.

३. तुळशीची पाने व आवळ्याची पावडर पाण्यामध्ये मिळवा आणि याचा लेप बनवा आणि या लेपाने आपल्या केसांची मालिश करा. अर्ध्या तासासाठी असेच ठेवा आणि नंतर केस धुवून घ्या.

४. खोबरेल तेलही कोंड्यावर फारच गुणकारी आहे. आठवड्यातून दोन ते तीन वेळा खोबरेल तेलाने मसाज करा.

(क्रमशः)





कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886


ज्योतिर्मय साहित्य

तुकोबारायांना आपलं हितच कळतं. आपल्या हिताची आपल्याला पूर्ण कल्पना कधीच नसते. आपलं चांगलं कशात आहे हे आपल्यापेक्षा संतांना जास्त कळते. जीवाची मुक्तता कशात आहे? आम्हाला कशातच कळत नाही .आम्हाला वाटतं प्रपंच करण्यातच धन्यता आहे. पण प्रपंचातून बाहेर पडण्यास जीवनाची धन्यता असते. हे संत सांगतात. दशरथा नाही म्हणू नकोस, जाऊ दे.दशरथाला नाईलाजाने का होईना पण परवानगी द्यावी लागते. काय ?कुणाला माहिती कोण राक्षस आहे? कसा आहे? काय आहे? आपली मुलं लहान आहेत. कसं करायचं? काय करायचं? परंतु वशिष्ठ बोललेले असल्यामुळे कुणाला विरोध करायची प्राज्ञा नव्हती. आदरयुक्त भीती सगळ्यांच्या अंतःकरण होती.जाऊ दे जाऊ दे जाण्याबद्दल काही म्हणणं नाही पण रामाने जावे यज्ञाचे रक्षण करावे त्यांचं ते कामच आहे. परंतु हल्ली राम जरा शांत असतो. अंतर्भूत असतो कुणाशी फारसा बोलत नाही. हसत नाही. जेवणामध्ये त्यांचे लक्ष नसते. काय ? कांही कळत नाही. आपण एकदा विचारून पहा अशी खंत वरिष्ठांना दशरथाने बोलुन दाखविली. मग वशिष्ठांनी रामास विचारले. काय बाबा काय झाले? काय मनामध्ये काय विचार आहे? गंभीर असतोस? बोलत नाहीस? आणि मग रामचंद्र प्रभूंनी भूमिका मांडली. त्यामध्ये त्यांनी सांगितलं की हे जग पाहतो या जगतामध्ये जीव जन्माला येतो तरुण होतो प्रौढ होतो वृद्ध होतो मरतो पुन्हा जन्माला येतो पुन्हा मरतो हे जन्म मरणाचे संसारण ज्या कर्मामुळे माणसाच्या मागे लागलेलेअसते, पदार्थांबद्दल अंतकरणांमध्ये आत्मत्व भावना, ममत्व भावना निर्माण होते.

(क्रमशः)

# भारत हा माझ्या हृदयाचा एक अविभाज्य भाग आहे





## रवींद्रनाथ टागोर


विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

ही नाटके रवींद्रनाथांनी जवळपास १४५ वर्षांपूर्वी लिहिलेली असली तरी आजही ती ताजी टवटवीत वाटतात. आजही त्यांचे प्रयोग होत असतात. या नाटकांच्या माध्यमातून रवींद्रनाथांनी जो संदेश त्या काळात दिला तो आजही कालबाह्य झालेला नाही. रामायणातील एका घटनेवर आधारित कालमृगया हे त्यांचे संगीत नाटक आहे. या नाटकात त्यांनी एक अंध असलेल्या संताचा आज्ञाधारक मुलगा दाखवला आहे. त्याला ऋषीकुमार असे म्हटले गेले आहे. आपल्याला रामायणातील ही कथा श्रावणबाळाची कथा म्हणून परिचित आहे. परंतु या कथेला रवींद्रनाथांनी वेगळा आयाम दिला. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर या कथेला रवींद्र टच लाभला आहे.

दशरथ राजा मृगयेसाठी म्हणजेच शिकारीसाठी अरण्यात येतो. एका हरणाच्या पाडसाचा पाठलाग तो करीत असतो. शरयू नदीच्या काठावर तो येतो. हरीण जंगलातच कुठेतरी अदृश्य होते. याच सुमाराला ऋषिकुमार आपल्या अंध पित्यासाठी पाणी घेऊन जाण्यासाठी नदीकाठी येतो. हे दिवस पावसाळ्याचे आहेत. शरयू नदी दुथडी भरून वाहत आहे. विजा चमकत आहेत. त्याचे वडील त्याला अशा वातावरणात पाणी आणण्यासाठी बाहेर पडू नकोस असे सांगतात तरी देखील आपल्या तहानलेल्या पित्यासाठी पाणी घेऊन जाण्यासाठी हा ऋषीकुमार नदीकाठी येतो. आपल्या घागरीत तो पाणी भरतो. तो आवाज हरणाच्या पाडसाचा आहे असे दशरथ राजाला वाटते आणि तो शब्दभेदी बाण सोडतो. ऋषीकुमाराला हा बाण लागून तो जखमी होऊन पडतो. आपल्या हातून एका निरपराध ऋषीकुमाराला बाण लागला आहे हे पाहिल्यावर दशरथ राजाला प्रचंड धक्का बसतो आणि दुःख होते. शेवटच्या अवस्थेत असलेला ऋषीकुमार आपल्याला आपल्या वडिलांकडे घेऊन जावे अशी विनंती दशरथ राजाला करतो. त्याप्रमाणे दशरथ राजा अंतिम घटका मोजत असलेल्या त्या ऋषीकुमाराला त्याच्या अंध पित्याकडे घेऊन जातो. अर्थातच आपल्या पुत्राला त्या अवस्थेत पाहून त्या अंध पित्याला अपरंपार शोक होतो. दशरथ राजा वारंवार क्षमायाचना करतो. पण आपल्या पुत्राच्या मृत्यूने शोकाकुल झालेला तो अंध पिता दशरथाला तुझा देखील पुत्रशोकाने मृत्यू होईल असा शाप देतो. रामायणातील ही कथा आपल्याला परिचित आहे. या नाटकात दशरथ राजा, अंध संत आणि त्यांचा मुलगा यांचे संवाद काव्यात्मक जरी असले तरी त्यांना एक प्रकारची गद्य लय आहे त्यामुळे ते संवादासाठी, अभिनयासाठी आणि गायनासाठी सुलभ होतात. या नाटकात ऋषीकुमार आणि दशरथ राजा यांचे कथानक जरी प्रमुख असले तरी यात एक दुसरेही उपकथानक आहे. आणि त्यामुळेच हे नाटक वेगळे ठरते.



## जात्यावरच्या ओव्या......

-----------------------------------------

### नातेसंबंध : पती-पत्नी

दुरून दिसती
ढवळी मोटार कुणाची ?
लाडाची लेक माझी
आली मडबीन उन्हाची ||७१||

माहेरच्या वाटा
टांगा कोणाचा पळतो ?
गवळणी बाई
पदर जरीचा लोळतो ||७२||

-----------------------------------------

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## फुलमाला....



### मधुमालती...

मनमोहक रंग रूप
त्यात ही वसंतप्रीती
चहूअंगांनी बहरली
देखणी मधुमालती
तप्त उन्हाच्या झळा
सोसूनीही हिचे फुलणं
निसर्गाच्या हे अंगावर
खुलले जणू सुंदर लेणं

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज.

ज्योतिर्मय साहित्य

नेताजी सुभाषचंद्र बोस आणि त्यांची पत्नी एमिली शेंकल-बोस यांची मुलगी अनिता बोस यांचा जन्म २९ नोव्हेंबर १९४२ रोजी ऑस्ट्रिया मधील विएना येथे झाला. सुभाषचंद्र बोस आणि एमिली शेंकल-बोस यांनी मुलीचे नाव अनिता हे १९ व्या शतकातील महान इतालवी क्रांतीकारी जिउसेप गौरीबाल्डी यांच्याबरोबर अनेक लढायांमध्ये भाग घेतलेल्या पण शहीद झालेल्या अनिता गौरीबाल्डी यांच्या सन्मानार्थ ठेवले. अनिता बोस यांचा जन्म दुस-या महायुध्दाच्या काळात झाला. त्या नेताजी सुभाषचंद्र बोस आणि एमिली शेंकल-बोस यांच्या एकमेव अपत्य आहेत. अनिता बोस यांच एक महत्वाचं विधान प्रसिद्ध आहे... ‘‘मी भारतात जन्मले नाही, तिथे मोठीही झाले नाही, पण भारत हा माझ्या ह्रदयाचा एक अविभाज्य भाग आहे.‘‘ १९४१ च्या उत्तरार्धात दुसरे महायुद्ध आशिया खंडात पसरत चालले होते. ब्रिटीश साम्राज्य ज्या सिंगापुर या भागावर होते ते सिंगापूर १९४२ च्या फेब्रुवारीमध्ये जपान या देशाच्या युध्दामध्ये ताब्यात आले. जर्मनीमध्ये असलेल्या नेताजींना आशियामध्ये जायचे होते. हे काम कठीण होते. त्यासाठी प्रथम रोम मधून हवाई जहाज मार्गे आशियात जाण्याचे नक्की करण्यात आले. पण ही गुप्तयोजना बाहेर फुटल्यामुळे हा बेत रद्द करण्यात आला. हा बेत रद्द झाल्यामुळे त्यांची मुलगी अनिता जिचा जन्म २९ नोव्हेंबर १९४२ चा.तीला ते भेटू शकले. डिसेंबर १९४२ मध्ये ऑस्ट्रिया येथील विएना येथे ते गेले होते. त्यावेळेस त्यांच्याबरोबर ए.सी. एन. नंबियार हेही होते. नेताजी यांना झालेला आनंद अवर्णनीय होता. फेब्रुवारी १९४३ मध्ये पाणबुडीतून युरोपमधुन आशियाकडे प्रवास करण्यापूर्वी ८ फेब्रु. १९४३ रोजी नेताजींनी आपण लग्न केल्याचे तसेच आपणाला एक मुलगी असल्याचे आपले थोरले बंधू शरतचंद्र बोस(मेजदादा) यांना पत्राने कळविले होते. बंगाली भाषेत लिहिलेल्या या पत्रात, मला माझ्या भारताला स्वातंत्र्य मिळविण्याच्या युध्दात अपयश आले आणि माझे काहीही बरे-वाईट झाले तर मला तुमच्याशी संपर्क साधता येणार नाही. त्यासाठी हे पत्र लिहित असून माझ्या गैरहजेरीत मला आयुष्यभर देत असलेले प्रेम माझ्या पत्नीला आणि मुलीला द्यावे तसेच माझ्याकडून अपूर्ण राहिलेले काम माझ्या पत्नीकडून आणि मुलीकडून पूर्ण होण्यासाठी मी देवाकडे प्रार्थना करीत आहे असे म्हंटले. दुर्देवाने शरतचंद्र बोस यांना हे पत्र दुसऱ्या महायुद्धाच्या काळात चार वर्षे जेलमध्ये इंग्रजांनी त्यांना कैदेत टाकल्याने त्यांची सुटका सप्टेंबर १९४५ मध्ये झाली. त्यांना हे पत्र स्वातंत्र्य लढ्यात सहभागामुळे व नेतृत्वामुळे कैदेतून सुटल्यानंतर काही काळानंतर मिळाले. १८ ऑगस्ट १९४५ रोजी विमान अपघातात नेताजी सुभाष चंद्र बोस यांचे निधन झाले.

डिसेंबर १९३७ मध्ये ऑस्ट्रिया मधील साल्जबर्ग येथील प्राकृतिक स्वास्थ्य केंद्राच्या (स्पा रिसॉर्ट ) बादगास्टाइन येथे गुप्त पदतीने नेताजीनी एमिली शेंकल यांच्याशी विवाह केला होता. नेताजी यांची आपली पत्नी एमिली शेंकल आणि मुलगी अनिता बोस यांच्याशी शेवटची भेट फेब्रुवारी १९४३ मध्ये झाली होती. म्हणजेच अनिता बोस यांचे वय जेमतेम त्यावेळी दोन महिन्याचे होते. शरतचंद्र बोस यांनी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नेताजी सुभाषचंद्र बोस यांची पत्नी एमिली शेंकल आणि मुलगी अनिता बोस यांना भेटण्यासाठी युरोप दौरा केला. २९ नोव्हेंबर १९४८ रोजी म्हणजेच अनिता बोस यांच्या ६ व्या वाढदिवशी शरतचंद्र बोस हे त्यांची पत्नी बिवाबती बोस आणि मुले शिशिर, रोमा व चित्रा यांच्यासह एमिली शेंकल यांच्या घरी उपस्थित होते. त्यांचा काही दिवस मुक्काम एमिली शेंकल यांच्याच घरी होता. नोव्हेंबर १९४८ मध्ये त्यावेळी बिवाबती बोस म्हणजेच नेताजी यांच्या वहिनी यांनी आपल्या हातातल्या सोन्याच्या बांगड्या काढून त्या एमिली शेंकल यांच्या हातात घातल्या. त्या बांगड्या एमिली शेंकल यांचा मृत्यू मार्च १९९६ मध्ये होईपर्यंत त्यांच्या हातात होत्या. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी भारत सरकारने आपल्या एका मंत्र्यास सहभागी होण्यासाठी पाठविले होते. शरतचंद्र बोस यांचा नातू सुगात बोस तसेच मुलगी रोमा त्यावेळी अंत्यसंस्कार विधीसाठी हजर होते.

१९६०-१९६१ मध्ये अनिता बोस त्यांचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर भारत दौ-यावर शिशिरकुमार शरतचंद्र बोस तसेच बोस परिवाराच्या सततच्या पाठपुराव्यामुळे



आल्या. प्रथम त्या कलकत्ता येथील बोस परिवाराच्या १, वूडबर्न पार्क येथील निवासस्थानी राहिल्या. या घरात सुभाषचंद्र बोस यांच्याबरोबर महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरू, सरोजिनी नायडू यांच्यासारख्या अनेकांनी १९३० च्या दशकात वास्तव्य केले होते. बोस परिवाराने तसेच बंगाल आणि भारतातील नागरीकांनी अनिता बोस यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात स्वागत केले. तसेच त्यांची भाषणे आयोजित केली होती.

स्वातंत्र्यसेनानी देशबंधू चित्तरंजन दास यांच्या पत्नी बसंती देवी यांना सुभाषचंद्र बोस कायमच आईसारखा सन्मान देत असत. बसंतीदेवी या अनिता बोस यांना भेटल्यानंतर अत्यंत भावुक झाल्या. त्यांच्याकडेही अनिता बोस यांचे विशेष जाणे-येणे या काळात घडले. या भेटीत विशेषतः अनिता बोस बंगाली रीतिरिवाज सांभाळत होत्या. हाताने जेवण करणे, साडी परिधान करणे, मोठ्यांना वाकून पायाला स्पर्श करून नमस्कार करणे या सर्व भारतीय संस्कृतीशी निगडीत गोष्टी त्या आचरणात आणत होत्या. नेताजी यांची कन्या अनिता बोस यांची भारताशी असलेली नाळ अतूट होती. अनेक वर्षे परदेशात राहूनही त्यांचे मन सतत भारताकडे ओढले जात होते. या ओढीला प्रत्युत्तर म्हणूनच त्यांच्या भारत भेटीचे आयोजन झाले. यादरम्यान भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी देखील अनिता बोस यांना विशेष आमंत्रण दिले. पंडीत नेहरूंनी दिलेल्या आमंत्रणाप्रमाणे त्यांच्यासोबत काही दिवस अनिता बोस राहिल्या. दिल्ली विमानतळावर त्यांचे स्वागत करण्यासाठी स्वतः राजीव गांधी हजर होते. दिल्लीतील अनिता बोस यांचा प्रवास, राहण्याची व्यवस्था, पंडीत नेहरू यांनी स्वतःलक्ष घालून केली होती. दिल्लीतील पहिल्या भारत भेटीतील त्यांचे वास्तव्य आनंददायी आणि स्मरणीय ठरले. पंडीत नेहरू आणि सुभाषचंद्र बोस यांची मैत्री वाखाणण्यासारखी होती. नेहरूजींच्या संवेदनशीलतेचे आणि थोर व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते ते अशा गोष्टीमुळेच. नेताजींच्या कन्येकडे केवळ पाहुणी म्हणून नाही, तर एका जिव्हाळ्याच्या नात्याने ते पहात होते. यानंतर १९८७ साली राजीव गांधी पंतप्रधान असताना पुन्हा एकदा दिल्लीत अनिता बोस यांची त्यांच्याशी स्नेहपूर्वक भेट झाली. या संवादातून एक गोष्ट ठळकपणे जाणवते की, अनिता बोस आणि नेहरू-गांधी कुटुंब यांच्या अत्यंत सौहादपूर्ण आपुलकीचे संबंध होते व आहेत. प्रत्येक भारत भेटीच्या वेळी अनिता बोस यांना भारतातील समाज जीवनाची,सांस्कृतिक वारश्याची आणि त्यांच्या वडिलांच्या कार्याचा ठसा पाहण्याची संधी मिळाली. अनिता बोस यांना जाणवले की, नेताजींच्या कार्याने भारतीय जनतेच्या मनात आजही तेवढीच प्रेरणा आणि आदर त्यांच्याबद्दल अजुनही आहे.



शिरीष चिटणीस

अनिता बोस प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा विवाह मार्टिन फाफ यांच्याशी झाला. त्यांना तीन अपत्ये आहेत. जर्मनीमध्ये त्या स्थायिक आहेत. त्या जर्मनी मधील सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ जर्मनीच्या सदस्या आहेत. अनिता बोस यांनी मोठेपणी त्यांच्या वडिलांच्या कार्याचा अभ्यास केला आणि त्याबद्दल अभिमान बाळगल आहे. अनिता बोस-फाफ यांचे जीवन हे नेताजींच्या तेजस्वी वारशाला जपत, स्वतःच स्वावलंबी आणि प्रतिष्ठित आयुष्य जगणाऱ्या एका सुसंस्कृत व्यक्तिमत्वाच उत्तम उदाहरण आहे. त्यांचं शांत पण, सशक्त आस्तित्व भारत आणि जगासाठी एक प्रेरणास्त्रोत आहे. त्यांचे वय सध्या ८४ वर्षे असून नेताजींच्यावरील त्यांचे संशोधनात्मक लिखाण आपणा सर्वांना प्रेरणा देत आहे. नेताजी सुभाष सुभाषचंद्र बोस यांची पीटर अरुण, थॉमस कृष्णा आणि माया कैरीना ही तीन नातवंडे त्यांची आई अनिता बोस यांच्या प्रेरणेने आपल्या भारतवासियांचे नांव दैदीप्यमान करीत आहेत.

## वाचकांच्या लेखणीतून...

"दर वेळेस क्रांती चौकच का?"
– एक विचारप्रवृत्त करणारा सवाल

नागरिकांच्या रोजच्या आयुष्यात सतत अडथळा ठरणारी एक गोष्ट म्हणजे, सार्वजनिक रस्त्यांवरील आंदोलने आणि मोर्चे. विशेषतः क्रांती चौक – हे ठिकाण जणू आंदोलनांचे अनधिकृत केंद्र बनले आहे. प्रश्न असा निर्माण होतो की, प्रत्येक वेळी क्रांती चौकच का?
प्रत्येक आंदोलन, मोर्चा किंवा सभा यासाठी याच चौकाची निवड का केली जाते? दोन, तीन, चार तास चालणाऱ्या कार्यक्रमांसाठी हजारो लोकांना अडवून ठेवणे, वाहतूक विस्कळीत करणे, हे कितपत न्याय्य आहे? रुग्णवाहिका अडकतात, परीक्षेला जाणारे विद्यार्थी ताटकळत उभे राहतात, नोकरीला जाणारे नागरिक उशीराने पोहोचतात. शाळकरी मुलांपासून वृद्धांपर्यंत सगळ्यांनाच या अडथळ्याचा त्रास होतो. एखादं आंदोलन फक्त १०० ते २०० लोकांसाठी असतं, पण त्याचा फटका हजारो लोकांना बसतो. हा काय लोकशाहीचा उपयोग आहे की लोकशाहीवरच अन्याय?
विशेषतः परगावाहून आलेल्या नागरिकांसाठी ही स्थिती आणखी त्रासदायक ठरते. रस्ते बंद, मार्ग ठप्प, कोठेही माहिती नाही अशा परिस्थितीत त्यांची मानसिक व शारीरिक अवस्था नाजूक होते. ही आंदोलनं लोकहितासाठी असतात की लोकांच्या जिवावर उठलेली असतात, असा प्रश्न पडतो.
प्रशासन वारंवार सूचना देत असलं तरीही काही नेते आणि संघटना आपला हक्क म्हणूनच सार्वजनिक ठिकाणी अडथळे निर्माण करतात. परंतु सत्य हे आहे की, कोणत्याही पक्षाला, संघटनेला किंवा नेत्याला सामान्य जनतेला वेठीस धरण्याचा कायदेशीर अधिकार नाही.
आज गरज आहे ती स्वतःला प्रश्न विचारण्याची:
आपली पद्धत योग्य आहे का?
ज्या लोकांसाठी आपण लढतो, त्यांनाच आपण त्रास देत आहोत का?
लोकशाहीत मतभेद असतात, त्यावर आंदोलनंही होतात. पण ती ज्या पद्धतीने केली जातात, तीच लोकशाहीची खरी परीक्षा असते.
रस्ते हे आंदोलनाचे व्यासपीठ नव्हे – ते सामान्य माणसाच्या जगण्याचे साधन आहेत.
आज जेव्हा संपूर्ण देश प्रगतीच्या मार्गावर आहे, तेव्हा अशा प्रकारच्या त्रासदायक आणि असंवेदनशील आंदोलनांनी जनतेची सहनशीलता संपवली आहे.
नेतेमंडळी, पक्षप्रमुख, आणि संघटनांनी आता तरी याचा गांभीर्याने विचार करावा, आणि 'लोकशाही' ही लोकांसाठी असते हे लक्षात घ्यावे.
✍राधेश्याम झंवर
छत्रपती संभाजिनगर
मोबाइल - ७५८८५९६९०२



## इंदापूरी निखारे

### ट्रम्प तात्या...



ज्योतिर्मय साहित्य

नमस्ते इंडिया...
असं त्याने म्हंटले...
आणि तेव्हापासून तो अतिशय लाडका होऊन गेला...
कोण काय?
ट्रम्प तात्या...
आता तात्या म्हणजे आदरयुक्त व्यक्ती...
तात्यांचे कित्येक जणांच्या मनात आदराचे स्थान...
आणि आदर म्हणालो की...
त्यांनी काहीही केले तरी आदर्शच...

तात्या म्हणजे काही असा तसा नाही...
जगातील सर्वात श्रीमंत अमेरिका राष्ट्राचा राष्ट्राध्यक्ष...

अमेरिका राष्ट्र खरंच आदर्शवादी...
ते उगीच नीतिमत्ता, भावना वगैरेला महत्व देत नाही...
हे सांगायची तशी गरज नाही...
पण आदर्श तात्या बद्दल माहिती असावी म्हणून...

तात्यांनी तीन लग्न केली...
आणि त्यांना पाच मुलं आहेत...
असे हे आदरणीय आणि आदर्श जगातील एकमेव व्यक्तिमत्व...
अशा व्यक्तीला पण फार फार कठीण काळात त्रास दिला जातो...

ती घटना फारच धक्कादायक होती...
आपल्या सर्वांचे अतिशय लाडके...
ट्रंप तात्या...
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष...
तेथील कोर्टाने शिक्षा दिली...
आणि तेही म्हणे...
लैंगिक अत्त्याचार केला म्हणून...

फार फार वाईट वाटतंय...
जगात सर्वात सुसंस्कृत आणि श्रीमंत देश...
जगातील कित्येक राष्ट्रे...
पायाशी लोळण घेत असणारे...
असा त्या अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष...
माजी असला म्हणून काय झाले?

आणि त्या अशा...
जगभर आदरणीय व्यक्ती असलेल्या ...
साध्या बलात्कार, लैंगिक शोषण प्रकरणी...
कुठल्या तरी बाईने...
बहुतेक म्हणे पत्रकार बाईने...
खूप खूप वर्षापूर्वी म्हणे...

बाकी सगळं पटेल त्या अमेरिकेचे...
पण एव्हढा मोठा माणूस...
श्रीमंत,सुसंस्कृत...
राष्ट्राध्यक्ष पण...
त्याच्या सारख्यावर एफ आय आर...
झालीच कशी?

ट्रप तात्या ये रे इकडे...
पळून भारतात...
आणि बस जंतरमंतर वर...
तुला सगळी मदत केली जाईल...
तुझा जाहीर सत्कार सुद्धा करु...
पण तो तात्या आहे...
तो पुन्हा एकदा राष्ट्राध्यक्ष झाला...
हा देश पण सुसंस्कृत आहे...
आणि क्षमाशील पण...
आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं...
मुली, स्त्रिया यांच्यासाठी...
येथील लोकं खूप काळजी घेतात...
हे तर माहित आहेच...

तुझे कोणीही नसलेले...
पण पुरुष म्हणून तुला मान देणारे...
जगभरातील सर्व पुरुष...
ती वेळ आली आहे...
जगातील स्त्रियांसंबंधी कायदे बदलून टाकण्याची...
आता तू पुन्हा राष्ट्राध्यक्ष झाला...
जगातील कोणतेही प्रश्न...
चुटकी सारखे सोडवून टाकतो...
हे दाखवून दिलेच आहे की...
तात्या, आदर्श, आदरणीय...

मातृदिनाच्या खूप खूप शुभेच्छा...
तुझ्यासारखा आदर्श पिता सर्वांना मिळावा...
मुलांना एक आई नाही तर...
तीन तीन आई असण्याचे भाग्य मिळावे...

# इंदापूरकरांच्या विद्रोही काव्यात.... व्यवस्थेचा बुरखा फाडणारे वास्तव- डॉ.धोंडोपंत मानवतकर

**ज्योतिर्मय साहित्य**

ज्येष्ठस्नेही सतीशजी इंदापूरकर यांचा ‘‘ इकोस ऑफ सायलेन्स ‘‘ हा कवितासंग्रह आपल्या पुढ्यात आहे. त्यांचा हा पहिलाच कवितासंग्रह आहे असं म्हणण्यास मन धजत नाही, कारण त्यांच्या प्रत्येक कवितेत वास्तवानुभूतीतल्या प्रगल्भ जाणिवांचे आशयद्रव्य ठासून भरलेले आहे. इंदापूरकरांच्या मनोभूमीत अनेक विषयांची कथाबीजे रुजलेली असून त्यांच्या कथाबिजांतून अनेक कथाकाव्यांचा जन्म झालेला आहे आणि तीच कथाकाव्ये प्रस्तुत संग्रहात समाविष्ट आहेत... या संग्रहातील कवितेत प्रसंगाची भूमी कथेची आहे मात्र भूमिका कवितेची आहे म्हणून तिचा परिघ दीर्घ अवतरणाचा आहे... ती लवकर एक्सपोज होत नाही. कोणत्याही कथानकात वाचक जसा गुंतत जातो... तसाच या कवितेचा वाचक सुद्धा शब्दांकित केलेल्या प्रसंगात गुंतत जाऊन गुंता काढत जाणारा असेल..!

इंदापूरकरांच्या कवितेत सहज डोकावताना ती अमूर्तबंधाची ( अब्स्ट्रॅक्ट ) वाटत असली तरी ती वास्तववादाचा पुरस्कार करणारी असून विद्यमान काव्यसृष्टीला नवा आयाम देणारी आहे.

ज्येष्ठस्नेही सतीशजींच्या व्यक्तिमत्वाचा खरा पिंड हा नाट्यधर्मी आणि रंगकर्मीचा आहे. ते गेल्या पाच दशकापासून रंगदेवतेची अथक सेवा करत आहेत... परंतु नाटकाच्या प्रदीर्घ प्रक्रियेद्वारे व्यक्त होण्यापेक्षा कविता त्यांना जवळची वाटू लागली आणि गेल्या दोन वर्षापासून ते कवितेच्या प्रेमात पडून कवितेतून व्यक्त होताहेत... तसे पाहता कविता आणि नाटक हे वाङ्मयप्रकारातील अभिव्यक्तीचे दोन वेगवेगळे फॉर्म असले तरी...एकाच विषयाला दोन वेगवेगळ्या फॉर्ममध्ये व्यक्त करता येते. काव्यस्नेही इंदापूरकरांनी सहजाभिव्यक्तिसाठी काव्य हा प्रकार निवडून मुक्तछंदात आपल्या कवितेचा प्रवास सुरू केला आहे आणि तो प्रवास यशस्वीसुद्धा झालेला आहे... त्यांच्या यशस्वी काव्यप्रवासाची पावती म्हणजे हा कवितासंग्रह होय..!

प्रस्तुत संग्रहातील सतीशजींची कविता अध्यात्मवादी किंवा रंजनवादी मूळीच नाही...किंवा ती कल्पनेच्या भराऱ्याही मारत नाही, तर ती घटनांच्या मूळाशी जाऊन दडपले जाणारे वास्तव निर्भिडपणे उजागर करते, हाच तिचा खरा स्थायीभाव आहे.

इथल्या सत्तापिपासू घंटापारध्यांचे कुकर्म चव्हाट्यावर आणण्याचे धाडस इंदापूरकरांची कविता करते. पोषण करणारेच जनतेची दिशाभूल करून शोषण करताहेत... संस्कृतीच्या गप्पा मारणाऱ्यांच्या देखत भरदिवसा स्त्री लूटली जाते. हे वास्तव डोळ्याआड करणाऱ्या व्यवस्थेचा ही कविता बुरखा फाडते. इंदापूरकरांची कविता प्रखर वास्तवाचा तळठाव घेणारी आहे .‘‘जेथे न जाय रवी, तेथे जाय कवी ‘‘ ही म्हण कवीच्या स्वभावधर्माचा इथे प्रत्यय आणून देते. समाजात घडणाऱ्या घटना कवीच्या नजरेतून सुटत नाहीत..त्या घटनांचे प्रतिबिंब म्हणजे या संग्रहातील कविता होय..!

या संग्रहातील सर्वच कविता वास्तव घटनांवर आधारित आहेत. या कथाकाव्यातील घटना अस्वस्थ करणाऱ्या आहेत, अंतर्मुख करायला लावणाऱ्या आहेत...

काम संपवून तो नर....
ठरलेले पैसे फेकून
फ्रेश होऊन
सभ्यतेचा मुखवटा चढवून...
आणि लपत छपत गल्लीतून बाहेर

समाजवास्तवाच्या अनेक दुर्लक्षित कंगोर्यांकडे कवीचा नेत्रकटाक्ष असतो... हे समाजवास्तव तो यासाठी चव्हाट्यावर आणतो की, मानवी समुहात वाढणारी ही कलंकित विकृती फोफावू नये. शालीन संस्कृतीच्या गप्पा मारणारेच विकृतीला जन्म देत असतात हे वास्तव समाजाच्या दृष्टीस आणून देण्याचं काम कवी, कलावंत करत असतो.

वर्तमानातल्या विकृत व्यवस्थेच्या वर्तनाचा सूर आळवणाऱ्या ह्या कविता एकाचवेळी मनात राग,चीड, द्वेष,अस्वस्थता,उद्विग्नता आणि विद्रोह यांचे मिश्रण करत वाचकाला खिळवून ठेवतात...

‘‘पण आजची सकाळ वेगळीच ...
लेझिम पथकाचा जल्लोष
ढोल-ताशांचे आवाज सर्वदूर...
गावातील सर्व स्त्रीपुरूष नटून थटून
लहान, तरुण मुले-मुली
बेभान होऊन नाचत नाचत
गावातल्या देवळाच्या मार्गाने...
गावातील बलात्कार झालेली तरुणी ...
बलात्कार केलेले गावातले चार तरुण...
एका सजवलेल्या बैलगाडीत
मस्त अगदी नटून थटून आनंदाने
मिरवणुकीत सहभागी...
नंतर बलात्कार झालेल्या तरुणीचा....
बलात्कार केलेल्या तरुणांचा
गावात गावकऱ्यांकडून
भव्य सत्कार समारंभ...

उपरोक्त कवितेतील घटना ही सामान्य जनतेच्या डोळ्यात धूळफेक करून समाजाची दिशाभूल करणारी तर आहेच शिवाय सभ्यतेचा नि मांगल्याचा बुरखा पांघरणारी आहे... अशा कितीतरी परोक्ष घटना सरणाच्या समीधा झालेल्या आहेत.

‘‘ मनमोहक सूर्यास्त‘‘ या कथाकाव्यातील घटना तर अंगाचा थरकाप करणारी नि वाचताना वाचकांचे काळीज चिरत जाणारी आहे, ती अशी....

‘‘साखर झोपेची वेळ
मोबाईल, टॉर्च लाईटचा प्रकाश
पायाखाली पडलेल्या पानांची सळसळ
अस्पष्ट कुजबुज...हळूहळू स्पष्ट शब्द ...
काळजीची वाक्ये...
तिची चप्पल, सलवार, कुर्ता
समोर चितेवर तीच जळून खाक झालेली....
पोलिस, पोस्टमार्टेम, डॉक्टर
सामूहिक बलात्कार...
पोलिस अधिकारी बॉडी ताब्यात
पुढील विधीसाठी
पोलिस अधिकाऱ्याचा प्रश्न...
आपण मोर्चा काढणार आहात का?
आपण कँडल लाईट, मूक मोर्चा वगैरे ...
पत्रकारांना,मिडियाला बोलाविणार आहात का?
सरकार,न्यायालय, अत्याचार, हक्क...
वगैरे वगैरे...
......तर दोन हवालदार देतो.
तो,अतिशय विनम्रपणे
यावेळी नको साहेब,
पण दुसरी मुलगी
दोनेक वर्षात मोठी होईल...
तिच्यावर बलात्कार होईल
तेव्हा नक्की साहेब...!
लग्नासाठी नाही, पण...
तिच्यावर होणाऱ्या बलात्काराच्या विरुद्ध...
न्याय मिळवून देण्यासाठी
आत्तापासूनच पैसे जमवितो‘‘

अत्यंत ह्रदयविदारक वास्तवाची नोंद या कवितेत आहे. सूक्ष्मदृष्टीतून अत्यंत तपशीलदर्शी वर्णन करून कवी इंदापूरकर वाचकांना अस्वस्थ नि हतबल करतात...


ती आली
अर्धनग्न अवस्थेत
पेंगत पडलेले पोलिस स्टेशन
खाडकन् जागे झाले
तिनं सांगितले
माझ्यावर बलात्कार झाला आहे
तक्रार नोंदवून घ्या
आपले नाव, पत्ता, वय ?
नाव सांगितल्यावर खूष झाला
पत्ता सांगितल्यावर अजून खूष झाला
वय सांगितल्यावर तर त्याचा आनंद
गगनात मावेनासा झाला
तिला म्हणाला घाबरू नको
त्याला तुझ्यासमोर नंगा करून ठोकतो.... ‘‘

कविता दीर्घ आहे, परंतु शेवटच्या पंक्ती अशा

‘‘सरकारी इस्पितळात ऐकलेले ते एका
नर्सचे वाक्य ... खूप अस्वस्थ करते ...
सामूहिक बलात्कार झालेल्या तरुणीवर
ओरडून, प्रचंड त्रासिक चेहऱ्याने म्हणत होती ...
‘‘ए, गप्प बस, रडू नको
एकाच वेळी मस्त चार चार ...
मज्जाच मजा की !
आम्हाला मात्र आयुष्यभर एकच ‘‘

अशा अनेक कवितांमधून इंदापूरकरांनी समाजातील नैतिक- अनैतिक भावनांचे, वासनांचे पदर उलगडले आहेत.

कवी आपल्या सम्यक आकलनातून समाजाचे राजस, तामस आणि सात्विक मूल्ये अधोरेखित करत असतो. तसा तो तात्विकमूल्यांचे आणि नैतिक मूल्यांचे भानही आणून देतो. या संग्रहातील अशीच एक कविता मनाला अस्वस्थ करणारी आहे... ती माझ्या आवडीच्या विषयाच्या अनुषंगाने म्हणजेच चित्रकलेच्यासंबंधाने आलेली आहे....




‘‘कोणी ताई...
कोणी आत्त्या...
कोणी मावशी...
प्रत्येकजण आग्रह ...
कळी,न्यूड होऊन...
त्यांच्यासमोर...
सर्वांनी पोट्रेट तयार करण्यासाठी ...
हातात रंग,ब्रश,पेन्सिल...
तिच्याकडे निरखून पाहत पाहत...
रंगात रंगून गेलेले ...
अनेक भाव पोट्रेट मध्ये...
५ वाजतात ...
कळी कपडे घालून बाहेर...
सर्व मुले,मुली आदराने तिच्या पाया पडतात ...
एका सुंदर अशा पाकिटात मानधन...
उध्वस्त होऊन गेलेल्या आयुष्यात...
नियतीने बहुतेक हा एक दिवस...
राखून ठेवला असणार...
उर्वरित आयुष्यासाठी...
एक वाक्य...
आपण पण बोला ना काहीतरी ...
कळी भारावून उभी रहाते...
सर्वत्र एकदम शांतता ...
काय बोलावे! काहीच कळत नाही...
फक्त एक प्रचंड हुंदका...
हॉलमध्ये घुमतो...
ह्रदय हेलावून टाकणारा...
तिच्या हुंदक्याचा अर्थ...
त्या मुला-मुलींना समजला असेल ...
माणूस म्हणून जगताना...
अनेक हुंदक्याचे अर्थ ...
समजून घेता यायला हवे ...
त्या नागड्या देहाच्या प्रदर्शनाने...
तिला काय भव्यदिव्य सांगायचे आहे?
नागडे सत्य आणि प्रदर्शन ...
या मध्ये खूप फरक असतो ...
एव्हढे मात्र नक्कीच समजले... ‘‘

ही कविता अगदी सहज,साधी,सरळ आणि उद्बोधकही आहे. जगण्यासाठी अनेक स्त्रीयांच्या वाट्याला आलेल्या भोगाचे हुंदके आणि गहिवर कुठेच सांडवता आले नाहीत.

कवी इंदापूरकरांच्या कविता दीर्घ स्वरुपाच्या आहेत आणि त्या सर्वच नोंद घेण्यासारख्या आहेत; परंतु विस्तारभयास्तव मी केवळ चार - पाच कवितेवर प्रकाश टाकला आहे. कलाकृतीची निर्मितीमूल्ये ही कलावंताच्या संवेदनेत दडलेली असतात आणि कलावंतांची आशय दृष्टीतील अनुभूती आस्वादाच्या पातळीवर दोन अन्वयार्थ धारण करत असते ती म्हणजे एक वाचकाच्या संवेदनेतला आणि दुसरा कवीच्या....

खरेतर कवीची भूमिका ही वाचकांकडून विशिष्ट अनुभव सिद्ध करीत असते..युगंधरा प्रकाशनाद्वारे प्रकाशित होणाऱ्या ‘‘इकोस ऑफ सायलेन्स ‘‘ कवितासंग्रहाचे वाचक स्वागत करतीलच यात शंका नाही. सतीशजी इंदापूरकरांच्या मराठी कवितांचे इंग्रजी भाषांतर करणारे प्रा.अरविंदजी कुलकर्णी आणि प्रकाशक सुनीता कावसानकर यांचा या संग्रहाच्या निर्मितीत मोलाचा आणि महत्वाचा वाटा आहे, त्यांचे हार्दिक स्वागत आणि अभिनंदन.. !

ज्येष्ठस्नेही सतीशजी इंदापूरकरांना पुढील काव्यलेखनासाठी मनस्वी खूप शुभेच्छा..!

**- डॉ.धोंडोपंत मानवतकर**
**भ्रमणभाष - ९८९०८२७४१४**

# मुंबईत रंगला २६ नोव्हेंबर चित्रपटाचा भव्य प्रीमियर

## दिग्गज कलाकारांची उपस्थिती; संविधानावर महत्वपूर्ण भाष्य

**ज्योतिर्मय साहित्य**

सध्या मराठी चित्रपटांना चांगले दिवस आले आहेत. वेगवेगळ्या धाटणीचे सिनेमे आपल्या भेटीला येत आहेत.नवे विषय, नवी मांडणी प्रेक्षकांना रुचत आहे. नुकतेच प्रदर्शित झालेले देवमाणूस, गुलकंद व आता थांबायचं नाही या चित्रपटांना रसिकप्रेक्षक भरभरून दाद देत आहेत. त्यातच आता २६ नोव्हेंबर हा चित्रपट ९ मे पासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाचा भव्य प्रीमियर नुकताच मुंबईच्या अंधेरीतील इन्फिनिटी मॉलमध्ये संपन्न झाला. या प्रीमियरसाठी २६ नोव्हेंबर या चित्रपटातील सयाजी शिंदे, अनिकेत विश्वासराव, डॉ.जुई जवादे, अंजली उजवणे, गणेश यादव, विजय पाटकर व मार्केटिंग प्रमुख व ट्रेंड अनालिस्ट गिरीश वानखेडे तसेच दिग्दर्शक सचिन उराडे आणि निर्माते अनिल कुमार जवादे व निलेश ओंकार आणि चित्रपटातील सर्व कलावंत व तंत्रज्ञ आदी मान्यवर उपस्थित होते.

इन्फिनिटी मॉलच्या पीव्हीआर मधील विशेष थिएटरमध्ये हा प्रीमियर सोहळा रंगला. सर्वत्र २६ नोव्हेंबर या चित्रपटाच पोस्टर्स दिसत होते. सर्व ठिकाणी असणाऱ्या एल.इ.डी स्क्रीनवर २६ नोव्हेंबर या चित्रपटाचा ट्रेलर धुमाकूळ घालत होता. या चित्रपटातील एकेक कलाकार हजेरी लावत होते. कलाकार व तंत्रज्ञ यांच्यासोबत त्यांचे कुटूंब उपस्थित होते. भव्य लाईट्स आणि चित्रपटाचे भव्य बॅनर तसेच आजूबाजूला स्टँडी पोस्टर यामुळे सर्वत्र २६ नोव्हेंबर या चित्रपटाचा बोलबाला दिसून येत होता.रात्री उशिरा असणारा हा प्रीमियर सोहळा दिमाखदार पद्धतीने पार पडला. याचे नियोजन काबिलेतारीफ होते व हिंदीच्या तोडीस तोड होते.

‘२६ नोव्हेंबर’ या चित्रपटाचा प्रीमियर अनुभवण्याची संधी मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. २६ नोव्हेंबर हा घटनात्मक हक्कांची जाणीव करून देणारा महत्त्वाचा चित्रपट आहे,असे मला वाटते. या चित्रपटाच्या पोस्टरवर लाल आणि काळ्या रंगांची तीव्र छटा संविधानाच्या संघर्षमय प्रवासाची आठवण करून देते. मध्यभागी उठून दिसणारे ‘२६ नोव्हेंबर’ हे ठळक, दमदार अक्षरं आणि त्याच्या पार्श्वभूमीवर सामान्य माणसाचा उठाव दर्शवणारा एक सळसळता समूह, हे स्पष्टपणे सांगतं की हा केवळ चित्रपट नसून, एक चळवळ आहे.या चित्रपटात अनिकेत विश्वासराव, सयाजी शिंदे, विजय पाटकर, गणेश यादव, मुश्ताक खान, भारत गणेशपुरे, किशोर चौगुले, डॉ. जुई जवादे, डॉ. विलास उजवणे आणि अंजली उजवणे यांसारखे प्रतिभावान कलाकार प्रमुख भूमिका साकारत आहेत. चित्रपटाच्या मार्केटिंग आणि स्ट्रॅटेजी प्रमुखाची धुरा श्री. गिरीश वानखेडे यांनी प्रभावी सांभाळली आहे. त्यांची कंपनी इंटायटी वन इंटरटेन्मेंट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड या अंतर्गत पब्लिक रिलेशन, मीडिया प्लॅनिंग, मार्केटिंग व वितरण हे कार्य करत आहे. अनेक चॅनेलसोबत टायअप, मराठी चित्रपटाचे एवढे मोठे भव्य प्रदर्शन व इनफिल्म ब्रँडिंग होत आहे.त्यामुळे हा चित्रपट विशेष आहे. ‘‘हा चित्रपट प्रेक्षकांना केवळ भावनिक करणार नाही, तर त्यांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्याची नवी प्रेरणा देईल. संविधान दिन १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीप्रमाणे मोठ्या प्रमाणावर साजरा व्हावा, हीच आमची इच्छा आहे.’’ अशी भावना दिग्दर्शक सचिन उराडे यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच ‘‘हा सिनेमा नागरिकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी उभा राहिलेला एक प्रेरणादायी आवाज आहे.‘‘ असे निर्माते अनिल कुमार जवादे आणि कार्यकारी निर्माते निलेश ओंकार यांनी सांगितले.




२६ नोव्हेंबर हा चित्रपट गरिबांमधील आर्थिक असमानता आणि त्यांच्या शोषणाच्या मुद्द्यावर प्रकाश टाकतो. तो त्यांना भारतीय संविधानाने दिलेल्या त्यांच्या स्वतःच्या हक्कांसाठी लढण्यास शिकवतो आणि प्रेरित करतो. संविधान कोणत्याही एका विशिष्ट जातीचे, समुदायाचे किंवा धर्माचे नाही तर ते देशातील प्रत्येक नागरिकाच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी अस्तित्वात आहे हे हा चित्रपट आपल्या खास शैलीद्वारे लोकांना पटवून देतो. प्रत्येक शाळेत जाणाऱ्या मुलाला प्राथमिक स्तरापासूनच संविधानाचे महत्त्व शिकवले गेले पाहिजे आणि प्रत्येक घरात संविधानाची प्रत कशी असावी याचा देखील हा चित्रपट आग्रह धरतो.यावेळी


आशिष निनगुरकर
चित्रपट अभ्यासक

चित्रपटाचे निर्माते अनिल कुमार जवादे म्हणाले, ‘‘सिनेमाचा उद्देश केवळ प्रेक्षकांचे मनोरंजन करणे नाही, तर प्रेक्षकांना त्यांच्या सभोवतालच्या परिसराची आणि त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी आणि जगाला सर्वांसाठी राहण्याचे एक चांगले ठिकाण बनवण्यासाठी शिक्षित आणि प्रबोधन करणे देखील आहे. २६ नोव्हेंबर हा चित्रपट त्याच्या शक्तिशाली कथाकथनाच्या माध्यमातून हेच करण्याचा प्रयत्न करतो.‘‘ चित्रपटाचे संगीत अर्थपूर्ण आणि सुरेल आहे. चित्रपटाची गीते प्रदर्शित होताच त्यांची लोकप्रियता वाढत आहे. चित्रपटातील एक रोमँटिक गाणे स्वप्नील बांदोडकर आणि आर्या आंबेकर यांनी गायले आहे तर दमदार शीर्षक गीत आदर्श शिंदे, पी. गणेश आणि तेजस्वी राय यांनी गायले आहे. गीतकार सचिन उराडे यांनी लिहिलेले चित्रपटातील दुःखद गाणे चित्रपटातील दमदार परिस्थिती प्रतिबिंबित करते. हे गीत प्रसिद्ध गायक जावेद अली यांनी गायले आहे. चित्रपटाच्या शेवटी आणखी एक दमदार गाणे आहे जे गौरव चाटी यांनी गायले आहे. चित्रपटातील चारपैकी तीन गाणी निलेश ओंकार यांनी लिहिली आहेत तर अमर प्रभाकर देसाई आणि स्वप्नील राजेश चौधरी यांनी संगीतबद्ध केले आहे. त्यांचे संगीत या चित्रपटाला एका वेगळ्याच पातळीवर आणि उंचीवर घेऊन जाते.

मराठीमध्ये सातत्याने वेगवेगळे विषय येत असून त्याची दखल घेतली जात असल्याचे अभिनेते अनिकेत विश्वासराव यांनी सांगितले तर सिनेमात पहिल्यांदा भूमिका केली,पण त्यातून खूपकाही शिकायला मिळाल्याचे समाधान आहे असे अभिनेत्री डॉ. जुई जवादे यांनी सांगितले. २६ नोव्हेंबर हा चित्रपट म्हणजे दीक्षाभूमीला वाहिलेले आदराचे फूल आहे, असे भावोद्गार प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी काढले. २६ नोव्हेंबर या चित्रपटानिमित्त प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे बोलत होते. चित्रपटाचे ७५ टक्के शूटिंग नागपूर परिसरात झाले असून महत्वाचा भाग ससेगाव झोपडपट्टीत चित्रित केला आहे.आजही समाजमन बऱ्यापैकी गढूळ आहे, महापुरुषांवरून वाद घडत आहे पण महनीय व्यक्तींना जातीधर्मात बांधू नये, त्यांचे विचार अंगीकारावे, असे सचिन उराडे म्हणाले. जम्बुद्विप प्रोडक्शनचा हा पहिला चित्रपट नागपूर भूमितलाही पहिला मोठा चित्रपट आहे, असे निलेश ओंकार म्हणाले. १५ ऑगस्ट, २६ जानेवारीप्रमाणे २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस साजरा करण्याची भावना रुजावी हा या चित्रपटनिर्मिती मागचा उद्देश असल्याचे निर्माते अनिल कुमार जवादे यांनी स्पष्ट केले. डॉ. विलास उजवणे यांचा हा अखेरचा चित्रपट होय. प्रभाकर आंबोणे, वत्सला आंबोणे यांच्यासह नागपूरचे बरेच कलाकार या चित्रपटात आहे. भव्य मांडणी केलेला व उत्तरोत्तर रंगत गेलेला हा प्रीमियर सोहळा संपूच नये असे वाटत होते. देशातील उपेक्षित लोकांना लक्षात घेऊन बनवलेला चित्रपट तयार केल्याबद्दल सर्वांनी निर्मात्यांचे कौतुक आणि अभिनंदन केले. २६ नोव्हेंबर हा चित्रपट पॅनोरमा स्टुडिओज तर्फे ९ मे पासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला असून या चित्रपटाची विशेष चर्चा सुरू आहे.या चित्रपटाच्या ट्रेलरला व प्रदर्शित गाण्यांना आजतागायत रसिकांचा उदंड प्रतिसाद लाभला आहे. सोशल मीडियावर यातील गाण्यांचे रिल्स तुफान व्हायरल होत आहेत.अनेक दिग्गज कलावंतांच्या मांदियाळी असलेला हा चित्रपट रसिकप्रिय होईल हा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.

# झूमका खाया रे....

**ज्योतिर्मय साहित्य**

सोनं एक अशा प्रकारची मौल्यवान वस्तू आहे की, कोणता ही कालवधी असो त्यावेळी सोन्याची किंमत उच्च असते. सुवर्ण अलंकारचे वेड महिला मध्ये अधिक असते !

डिसेंबर १९८३ ची घटना मी त्यावेळी तलवाडा ता. गेवराई जि.बीड येथे कार्यरत होतो.तेथील श्री.श्रीनिवास मुंदडा एक मारवाडी परिवार. व्यापार व शेती व्यवसायात अग्रगण्य व्यक्तीमत्व. मोठे कुटूंब असल्याने दुध देणाऱ्या म्हशी व गाईची संख्या बरीच. त्यांच्या देखभालीसाठी २/३ नोकर.

शनिवार आठवडी बाजाराचा दिवस. आठवडी बाजारात मेथी स्वस्थ होती. ३/४ मेथीच्या जुड्या मुंदडा यांनी खरेदी केल्या व त्यांच्या सूनबाईनी वेळीच निवडून ठेवल्या होत्या. सायंकाळच्या वेळी २/३ म्हशी घरा मागील गोठ्यात जाता जाता एका म्हशीने अंगणातील ओट्यावर ठेवलेली निवडलेली मेथीची जुडी फस्त केली. बर्याच वेळाने सूनबाईच्या लक्षात आले की, आपल्या कानात सोन्याचे झूमके नाहीत. बरीच शोधा-शोध केल्यानंतर लक्षात आले की, मेथी निवडतांना कानातील झूमके काढलेले होते व त्यावेळी निवडलेल्या मेथीच्या खालीच होत्या व त्या म्हशीने मेथी बरोबरच कानातील झूमके खाल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी म्हैस दवाखान्यात आणली व म्हशीला इंजेक्शन देऊन झूमके काढा ! अशी विनंती पशुपालका कडून होत होती.




मी म्हशीची रुमिनॉटॉमी शस्त्रक्रिया करुन घेण्याची विनंती केली होती. दोन महिन्या पुर्वीच म्हैस व्यालेली असल्याने शस्त्रक्रीये नंतर म्हैसीचे दूध बंद होईल असा त्यांचा समज होता. त्यांनी म्हशीचे पोट अतिसाराचे औषध देऊन स्वच्छ केल्यास शेणातून झुमके मिळतील असा त्यांचा समज होता. मी त्यांना रवंथ करणाऱ्या पशुच्या पोटाची

रचना सांगितली पण ते त्यांच्या भूमिकेवरच ठाम होते. शेवटी दिवसातून दोन वेळा मॅगनिसीयम सल्फेटचे दोन डोस द्यावे लागत असत.

मॅग सल्फच्या डोस मुळे म्हैस पातळ शेण टाकत असे. म्हैस घरातून दवाखान्यात निघताच पातळ शेण पडत असे व पडलेले शेण पाण्याच्या बकेट मध्ये टाकून सोन्याच्या झुमक्याचा शोध घेतला जाई. एक नोकर म्हैसीचे दावे घेऊन सज्ज व दुसरा म्हैसीचे शेण गोळा करुन झुमक्याचा शोध घेण्यासाठी असे व त्यांच्या वॅच ठेवण्यासाठी मुंदडा शेठचा मुलगा असे. हा प्रकार जवळपास आठ दिवस चालू होता. शेवटपर्यंत झुमके मिळालेच नाहीत व नाईलाजास्तव पुढील झुमके शोध मोहिम थांबवावी लागली...

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559